# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/11/2022 (मंगळवार) दुपार


### अपघातात मृत्यू

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत गौरखेडे यांचे शेता जवळ पोटा ते चनकापुर रोडवर चनकापुर ता. सावनेर येथे दिनांक १६/१०/२०२२ चे १९.१५ वा. दरम्यान यातील मृतक नामे— दिपक गुलाबराव कारेमोरे, वय ४५ वर्ष हे सोबत विनोद पुंडलिक रांगणकर, वय ४७ वर्ष, दोन्ही रा. वार्ड नं. ०२ चनकापुर, जय भोलेनगर हे मोटर सायकल क्र एम. एच.—४०/ए.एस—१४५१ ने सिल्लेवाडा वरून घरी येत असतांनी यातील मृतक यांनी आपले ताब्यातील मोटरसायकल अति वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन त्याचे गाडी वरील नियंत्रण सुटल्याने रोडच्या बाजुला जावुन पडले. पुढील उपचाराकरीता न्युरॉन हॉस्पिटल, नागपुर येथे भर्ती केले असता उपचारा दरम्यान दिनांक २५/१०/२०२२ रोजी यातील आरोपी मोटरसायकल चालक मृतक हा स्वतःचे मरणास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ), १८४ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन खापरखेडा करीत आहे.

**पो.स्टे. खापा** :— अंतर्गत ०१ किमी. अंतरावर सावनेर ते खापा रोड पराते आरामशिन जवळ येथे दिनांक १२/११/२०२२ चे रात्री २३.०० वा. दरम्यान यातील मृतक नामे— शुभम सुरेश पलांदुरकर, वय १७ वर्ष, रा. खापा हा आटो क्र MH 31 CP 4350 मध्ये बसुन खापा येथुन कोदेगाव पेट्रोलपंप येथे जात असता सदर ऑटो पल्टी झाल्याने मृतकाच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने उपचारा दरम्यान मेडीकल कॉलेज, नागपुर येथे दिनांक १३/११/२०२२ चे १२.३० वा. मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— विठ्ठल लक्ष्मण देशमुख, वय ५३ वर्ष, रा. वार्ड नं २, कसारपुरा केळवद यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन खापा येथे मृतक आरोपी चालकाविरुध्द कलम कलम २७९, ३०४ (अ) भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन खापा करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर